

‘तथापि’चा

# जिव्हाळा

अंतरंग


**संपादकीय** ...१

**मागोवा** ...२
कामकरी स्त्रियांचं योगदान

**पारगावच्या पारावरुन**...५
बचत गट

**शरीर साक्षरता** ... ८
फिस्टुला - एक दुर्लक्षित आजार

**हमसफर** ...१०
मी आणि माझी वस्ती

**माहितीच्या जगात** ...११
सच्चर समिती अहवालः एक अवलोकन (रचना विकास)


प्रिय साथी,

नव्या वर्षाच्या सर्वांना मनापासून शुभेच्छा. येणारं वर्ष सर्वांना निरामय आणि आनंदी जावो, येणारा काळ कल्पक आणि नाविन्यपूर्ण, ज्ञानमय असो अशीही मनापासून शुभेच्छा.

दोन हजार दहा. एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाची सुरुवात. येत्या २६ जानेवारीला आपल्या प्रजासत्ताकाला ६० वर्षं पूर्ण होणार. यावेळी पहिली आठवण होते ती घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची. त्यांना आणि स्वातंत्र्यासाठी लढलेल्या व नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताला उज्ज्वल दिशा देणाऱ्या सर्व नेत्यांना सलाम.

पण आज ६० वर्षांनंतर आसपास घडणाऱ्या अनेक घटना आपल्याला विचार करायला लावत आहेत. हरियाणातली रुचिका गिऱ्होत्राची केस ही विशेषकरुन चिंताजनक आहे. रक्षक असणारेच जेव्हा शोषण करतात, कायद्याचं पदोपदी उल्लंघन आणि अनादर करतात तेव्हा बाकीच्यांनी काय करायचं? फक्त बघत राहण्याशिवाय काय उरतं हातात? आपल्या राज्यघटनेने किंवा संविधानाने सर्वांना न्यायाची हमी दिलेली असताना असं का व्हावं?

एकीकडे साठाव्या प्रजासत्ताक दिनाची मानवंदना तिन्ही दलाच्या प्रमुख म्हणून भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील स्वीकारतील. या दिवशीच्या प्रदर्शनात भारताचं आरमार, अणुशस्त्रांची सज्जता या साऱ्याचं जगाला दर्शन घडेल. पण दुसरीकडे आजही समाजात स्त्रिया पुरुषांहून दुय्यमच मानल्या जात आहेत. कमला भसीनच्या फार समर्पक ओळी इथे आठवतात.

देश में गर औरतें अपमानित है, नाशाद है
दिल पे रख के हाथ कहिये देश क्या आजाद है

संविधानातली तत्त्वं सोयीने मोडली, वाकवली आणि विसरली जात आहेत. संविधानाला स्मरुन देशाचा कारभार करणारे लोकप्रतिनिधी पैसा देऊन मतं विकत आहेत आणि संपत्ती जमवण्याचा राजकारण हा राजमार्ग झाला आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असताना इथलं जनतंत्र मात्र पैसा, बळ, भ्रष्टाचाराने पोखरलं जातंय आणि इथल्या नागरिकांपेक्षा बड्या कंपन्या आणि व्यापाऱ्यांच्या हिताची जपणूक केली जात आहे. मग या सर्वात मोठ्या लोकशाहीचे आपण लोक मूकपणे हे सर्व पाहत राहणार का?

कळावे,

आपल्या,
मेधा, ऑड्री आणि
तथापि टीम

मा
गो
वा

# कामकरी स्त्रियांचं योगदान


किरण मोघे, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, महाराष्ट्र

*स्त्रियांचं कामच काय चूल अन् मूल. असाच सर्वसाधारण समज असतो. पण स्त्रियांच्या कामाची उघड्या डोळ्यांनी मोजदाद करायची ठरवली तर लक्षात येईल की स्त्रिया किती आणि कोणकोणती कामं करत असतात ते. समाजात बाईच्या श्रमाचा वाटा हा फार मोठा आहे. पण अजूनही त्या श्रमाचं कोणालाच मोल नाही आणि त्याची गणतीही होत नाही. या अतिशय महत्त्वाच्या विषयावरचा हा लेख.*

शेतात राबणारी मजूर, बहुराष्ट्रीय कंपनीच्या बोर्डरूममध्ये बसून महत्वाचे निर्णय घेणारी 'व्हाईस प्रेसिडेंट', दुसऱ्याच्या घरात जाऊन धुणे-भांडी करणारी घरकामगार, पीठ आणून स्वतःच्या घरात पापड लाटून देणारी, रस्त्यावर भाजी विकणारी, बँकेतील अधिकारी, प्रयोगशाळेतली संशोधक, जंगलात तेंदुपत्ता गोळा करणारी आदिवासी, कॉलेजमधील प्राध्यापिका, दवाखान्यातील परिचारिका, रेडिओवर बातम्या सांगणारी निवेदक ... 'काम करणाऱ्या' स्त्रियांनी अर्थव्यवस्थेत केलेल्या योगदानाचा विचार करायला लागलो तर कामकरी स्त्रियांची असंख्य रूपं डोळयासमोर येतात. पण हे योगदान नेमकेपणाने मोजून त्याचे मूल्याकंन करायचे ठरवले तर एवढे सोपे नाही हे लक्षात येते. कारण स्त्रियांच्या कष्टांचे विश्व प्रचंड गुंतागुतीचे आहे.

थोडा बारकाईने विचार केला तर 'काम करणाऱ्या' म्हणजे नेमक्या कोण? हे कसे ठरवायचे? अवतीभवती नजर फिरवली तर असे दिसते की काहीच काम न करणाऱ्या स्त्रियांची संख्या अत्यल्पच आहे! काही स्त्रिया घराबाहेर पडून तर काही आपापल्या घरात काम करतात. पण सर्वच घराबाहेर काम करणाऱ्या रोख पैसे कमवून आणतात आणि घरात काम करणाऱ्या सर्वच बिनपगारी आहेत असे नाही! उदा. काही जणी स्वतःच्या शेतात काम करतात. तर काही स्वतःच्या घराचा उपयोग कामाचे ठिकाण म्हणून वापरून पापड लाटण्यापासून हार-गजरे माळण्यापर्यंत किंवा कम्प्युटरवर काम करून पैसे कमवतात. शिवाय बहुतेक स्त्रिया स्वतःच्या घरात काही न काही स्वरूपाचे घरकाम करीत असतात. यातून एक नवीन प्रश्न निर्माण होतो. 'घरकामाला' 'काम' म्हणायचे का? केवळ 'बिनपगारी' म्हणून ते 'कष्ट' नाहीत का? त्याचे मूल्यांकन कसे करायचे? घरकामाच्या माध्यमातून पुरवल्या जाणाऱ्या सेवा बाजारातून विकत घेतल्या (उदा. हॉटेलमधील जेवण, लाँड्रीचा खर्च इ.) तर काही प्रमाणात या कष्टाचे मूल्यांकन होऊ शकते. पण त्यातल्या 'सेवाभावा' ची (care) मोजणी कशी करायची? आणि मग फक्त घरकाम करणाऱ्या स्त्रियांनी पगार मागायचा का?


आणखीन एक गंमत पहा... अनेक वेळा एकच स्त्री एकाच वेळी दोन तीन कामं करताना दिसते. इंग्रजीत याला 'मल्टी-टास्कींग' असे म्हणतात. म्हणजे एखादी बिडी कामगार घरात बसून बिड्या वळता वळता चुलीवर भाजी करताना आपल्या लहान मुलीचे संगोपन करीत असते. किंवा एखादी आई चपात्या लाटत असताना मुलांचा अभ्यास घेते. म्हणजे प्रत्येक 'कामाचे' मूल्यांकन करायला हवे आणि मूल्यांकन करताना 'रेट' काय



लावायचा? कारण परंपरागत दुय्यम स्थानामुळे स्त्रियांनी केलेले काम त्यांच्यासारखेच 'हलके' म्हणजे कमी दर्जाचे व कमी मूल्याचे समजले जाते. यामुळे अनेक अतिकष्टाच्या कामांसाठी (उदा. खुरपणी, माती-विटा वाहून नेणे, दळणे) स्त्रियांना पुरुषांपेक्षा रोज कमी मिळतो. शेती किंवा बांधकाम व्यवसायात स्त्रिया आणि पुरुषांना मिळणाऱ्या रोजंदारीच्या दरात हा फरक अधिक ठळकपणे दिसून येतो. त्यामुळे प्रचलित दराप्रमाणे मूल्यांकन केले तर स्त्रियांच्या कष्टांचे योग्य मापन होत नाही असे दिसून येते.

आज भारतात काम करणाऱ्या लोकांची संख्या अंदाजे ४० कोटी आहे. पैकी ३७ कोटी ज्याला 'असंघटित' किंवा 'अनपौचारिक' (कायद्याचे कोणतेच अधिष्ठान नाही असे) क्षेत्रात काम करतात. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या साधारण १२ कोटी, व त्यात कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या अंदाजे ३ कोटी आहे. परंतु वर नमूद केलेल्या अडचणींमुळे अनेक स्त्रियांचे कष्ट अदृश्य राहतात, अनेक काम करणाऱ्या स्त्रियांच्या कष्टाची पुरुषप्रधान दृष्टिकोनामुळे मोजणी होत नाही व स्त्रियांच्या कष्टांचे अवमूल्यन होत असल्याने हे सर्व आकडे केवळ काही ढोबळ अंदाज आहेत असेच मानावे लागेल. त्याही पुढे जाऊन, सरकारी आकडेवारीतून या सर्व स्त्रियांच्या योगदानाचे कोठेच मूल्यांकन केलेले दिसत नाही. म्हणजे भारताच्या किंवा एखाद्या घटक राज्याच्या एकूण राष्ट्रीय किंवा राज्याच्या सकल उत्पादनात स्त्रियांचा किती वाटा आहे याचे अंदाजच उपलब्ध नाहीत!

ही सगळी उणीव भरून काढण्यासाठी स्त्री अभ्यासक व महिला संघटनांच्या आग्रहास्तव स्त्रियांच्या योगदानाचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी केंद्र सरकारने ६ राज्यांचा अभ्यास हाती घेतला. हरियाणा, मध्यप्रदेश, गुजरात, ओरिसा, तामिळनाडू व मेघालय येथे काम करणाऱ्या स्त्रियांच्या वेळेचा वापर कशा पद्धतीने होतो याचा बारकाईने अभ्यास केला गेला. त्यातून पुढे येणारी आकडेवारी अतिशय बोलकी आहे. स्त्रियांनी केलेल्या 'बिनमोलाच्या' किंवा 'बिनपगारी' कामाचे मूल्य त्या राज्याच्या सकल घरगुती उत्पादनाच्या (स्टेट डोमेस्टिक प्रॉडक्ट) च्या अंदाजे २३ ते ४१% आहे! उदा. २००० साली मध्यप्रदेशच्या एकूण ७०,८१४ कोटी रुपयांच्या घरगुती उत्पादनाच्या तुलनेत स्त्रियांचे बिनपगारी काम अंदाजे ४१% म्हणजे २९,०३४ कोटी रुपये होते. परंतु ही आकडेवारी अजूनही सर्व राज्यांसाठी उपलब्ध नाही, त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर अंदाज करणे अजूनही शक्य नाही.



कामकरी स्त्रियांच्या कष्टांचे योग्य मूल्यांकन केवळ स्त्रिया किती काम करतात हे सांख्यिकी दृष्टीकोनातून सिद्ध करण्याचा येथे मुद्दा नाही. स्त्रियांचे योगदान वेगवेगळ्या माध्यमातून सिद्ध करणे सहज सोपे आहे! सर्वात सोपा मार्ग म्हणजे स्त्रियांनी काम न करणे! कामगार-कर्मचाऱ्यांच्या संपामुळे त्या-त्या उद्योगाचे काम बंद पडते परंतु क्षणभर सुद्धा सर्व स्त्रियांनी काम थांबवले तर अवघे जग बंद पडेल हे लक्षात घेतले पाहिजे! स्त्रियांच्या दृष्टीने हा मुद्दा यासाठी महत्वाचा आहे की समानतेवर आधारित समाज व्यवस्थेमध्ये कुटुंबांतर्गत आणि शासनाच्या पातळीवर काम करणाऱ्या स्त्रियांच्या आर्थिक योगदानाची परिपूर्ण दखल घेणे गरजेचे आहे. विशेषतः स्त्रियांसंबंधी धोरणे ठरवताना हा मुद्दा महत्वाचा ठरतो.

उदा. आज कामकरी स्त्रियांचा सर्वात मोठा प्रश्न हा आहे की त्यांच्यावर बाहेरच्या कामाचा आणि घरातील कामाचा असा 'दुहेरी' बोजा असतो. अनेक स्त्रियांना अर्थार्जनाशिवाय पर्याय नसतो. हा बोजा कमी करण्यासाठी बालसंगोपनाची

सोय असणे अतिशय महत्वाचे आहे. परंतु शासकीय पातळीवर पाळणाघरांसाठी जवळ जवळ काहीच तरतूद केली जात नाही. ज्या स्त्रियांना परवडते त्या खाजगी सेवेचा उपयोग करतात परंतु घरकामगार, बांधकाम मजूर, शेतमजूर इ. असंघटित क्षेत्रातल्या अनेक स्त्रियांना आपल्या लहान मुलांना अतिशय घातक परिस्थितीत कामावर न्यावं लागतं किंवा शक्य नसेल तर त्या कारणास्तव घरी थांबावे लागते.

आणखीन एक मुद्दा पोटगीची रक्कम ठरवण्याचा आहे. परित्यक्ता किंवा घटस्फोटित स्त्रीला पोटगीची रक्कम ठरवताना अनेक सन्माननीय न्यायाधीश अतिशय कमी रक्कम जाहीर करतात. पूर्वी तर सी आर पी सी १२५ कलमाखाली पोटगीच्या रक्कमेवर मासिक ५०० रुपये अशी मर्यादा कायद्यानेच टाकली होती! महिला आंदोलनाच्या प्रयत्नांमुळे ती आता काढून टाकली आहे. पोटगीची रक्कम ठरवत असताना स्त्रियांनी केलेल्या पगारी आणि बिनपगारी कष्टांचा विचार करून, तिच्या गरजांप्रमाणे रक्कम ठरवली पाहिजे. हाच मुद्दा स्त्रियांना संपत्तीत समान वाटा देताना पुढे येतो. अनेकांना 'स्त्रिया काम करीत नाहीत' (आणि सर्व पुरूष करतातच!) म्हणून त्यांना संपत्तीत समान अधिकार मिळू नयेत असे वाटते! घरकाम हे 'काम' धरून त्याचे योग्य मूल्यांकन केल्यास हा दृष्टिकोन सपशेल चुकीचा, व एका अर्थाने पुरूषांच्या 'फायद्याचा' कसा आहे हे लक्षात येते. पण घरकाम सोडा, शेतातल्या श्रमांचे काय? आज स्त्रिया आपापल्या शेतात राबतात पण त्या जमिनीच्या एका इंचावरसुद्धा त्यांना अधिकार सांगता येत नाही. एवढेच नाही तर आपल्या महाराष्ट्रात शेतमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे जे कृषि क्षेत्रात संकट ओढावल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यांच्यात काही स्त्रिया पण आहेत! परंतु जमीन त्यांच्या नावावर नसल्याने त्यांची गणना होत नाही! तर अनेक शेतकरी आत्महत्याग्रस्त विधवा स्त्रियांसमोर जमीन नावावर नसल्याने उदरनिर्वाहाचे गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. शेतकऱ्यासाठी जाहीर केलेल्या 'पॅकेजेस'मध्ये ग्रामीण स्त्रियांच्या कामाचा आणि कष्टांचा विचारच केलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

काम करणाऱ्या स्त्रियांच्या आर्थिक योगदानाला नाकारण्याची ही प्रवृत्ती समाजामध्ये एवढी प्रचलित आणि भिनलेली आहे की स्त्रिया स्वतःच आपल्या कामाला कमी लेखतात! दरवर्षी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात (मग तो केंद्रीय असो वा आपल्या महानगरपालिकेचा) कामकरी स्त्रियांसाठी सरकारने काय तरतूद केली आहे याकडे कोणाचेच लक्ष नसते! बालसंगोपन, पाळणाघरे, बाळंतपणाची रजा, हे आपले हक्क आहेत आणि सर्व काम करणाऱ्या स्त्रियांना ते मिळालेच पाहिजेत, असा समस्त स्त्रियांकडून आवाज उठत नाही. 'घर' हे घरकामगारांसाठी 'कामाचे ठिकाण' आहे आणि तिथे काम करणाऱ्या स्त्रियांची सुरक्षितता महत्वाची आहे असे लक्षात येत नाही आणि म्हणून जेव्हा शायनी अहुजासारखा प्रसिध्द अभिनेता आपल्याच घरात काम करणाऱ्या स्त्रीवर बलात्कार करतो तेव्हा मूठभर महिला व कामगार संघटना सोडल्या तर त्याबद्दलची तिखट प्रतिक्रिया येत नाही. आणि आजही स्वतःच्या घरात काम करणाऱ्या एखाद्या बाईला 'तुम्ही काय करता' असे विचारले तर 'काहीच नाही!' असे आश्चर्यकारक उत्तर ती पटकन देते! तेव्हा कामकरी स्त्रियांनीच आपले स्वतःचे आर्थिक योगदान प्रथम ओळखले पाहिजे. म्हणजे मग शासन आणि कुटुंबव्यवस्थेत त्याचे योग्य मूल्यमापन होऊन स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होण्याकडे वाटचाल होईल.

*(चित्रेः काम संदर्भ पुस्तिका, बाएफ प्रकाशन मधून साभार)*

*एका अंगणातून निघाले*
*रस्ते चार अंगणांचे*
*मध्येच काही वट्टे*
*बसलेले ऐसपैस*
*त्यांना टाळून, वळसा घालून,*
*चुकवत नजरा आम्ही सगळ्या*
*जमलो अंगणात पाचव्या.*
*तिथं आणि आम्ही*
*सावलीसारख्या लांबलो*
*उन्हासारख्या पसरलो*
*आणि कधी कुठल्या अंगणात*
*बसलो सावरून, जरा चोपून*
*चोपता, सावरता कधी तुटलो*
*आणि कधी उठलो सुद्धा...*

साभारः हम सबला, जुलै-सप्टेंबर २००९
जागोरी प्रकाशन
स्वैर अनुवादः अच्युत बोरगावकर

# गट निगालाय गट– चला पटापट

पारगावच्या पारावरुन

राम राम मंडळी. नवीन वर्षाच्या शुभेच्छा. हॅप्पी न्यू इयर...कसं काय गेलं मागलं वरीस? बरं हाय न्हवं सारं? तुमचं पत्र, चिठ्ठी काय बी न्हाई. आता ईमेल का फीमेल आली येकीची पर माजं अकाउंट न्हाई ना अजून...अन् त्ये नेटकॅफे बी न्हाई गावात. बाब्याला सांगावं लागतं त्ये वाचून दावायला. तवा पत्रच पाठवा बरं... पोस्टमनला बी सांगून ठिवलंय्...माजं पतुर देचील तर च्या पाजीन म्हून...जाऊ द्या.

सद्याच्याला आमच्या गावातल्या बाया लईच गडबडीत हायत्या. मागल्या महिन्याधरनं गावात एक नवा बचत गट सुरु झालाय न्हवं. तवापासून सगळ्या निस्तं गटाचं नाव घोकायल्यात. आता मंजुळीला बी घिऊन जायाचं हाय कमळीच्या मनात. पर कमळीला दाद दील ती मंजुळी कसली...बगू या काय व्हायलंय ते...चला.

'मंजुळे, ए ... अगं चाल की... किती वेळ लावायलीस...घड्याळ बग.'

'आले...वरड् नगं लई. अन् काय घड्याळ घड्याळ लावलंय्? एवढ्या घाईनं टायमावर पोचायचंय तरी कुठं?'

'म्हंजी... इसरलीस की काय? अगं आज हळदी-कुंकाचा कार्यक्रम हाय ना आपल्या गटाचा. काल निरोप धाडला होता मी भय्याकडं. सांगितला न्हाई का त्यानं?'

'सांगितला. पर कमळे, मला करायचं न्हाई अन् हळदी कुकाला कसं याचं ग? तूच जा.'

'आता कसं करावं माय? माजं आइक, कुनाला बोलू नगं अन् गपचिप कोपऱ्यामदी बसून ऱ्हा. कुकू म्याच देती तुला हाताव म्हंजी जालं...चल नाय म्हनू नगं...ह्या नवा गट लई फायद्याचा हाय अन् त्यात गेलं की जास्त बचत व्हती असं सांगायली व्हती सुभानरावाची बायकू. तिनंच ठिवलाय आजचा सोहळा. सुभानराव तर तुला माहित हाय...त्याच्या किती ओळखी हायता वरपातुर. म्हून त्याच्या बायकोला गट मिळालाय. अन् मागल्या मिटिंगीला नव्या खासदारताई बी आलत्या. त्येंच्या पक्षानं लई किमा काडल्यात गटासाठी. त्येचा फायदा घ्यायाचा असंल तर गटाची कामं करायला नगं? आपल्या जिल्ह्यात सगळीकडं गट काढलेत अन् बायांना लई फायदा भेटायलाय. चार टक्क्यानी कर्ज... उद्योग...चल चल. आटप आता. वाटंनं सांगते तुला सगळं...'

'आसं आसं...त्येंच्या पक्षाचं गट हाय म्हन की. पर म्या तर त्येंना मत दिलं नाय कमळे. गटात आल्यावर मत बी त्येंनाच द्याचं का?'

'अगं त्ये राहू दे. बचत तरी करशील का?'

'म्हंजी बचत बी आपुनच करायची? मला वाटायलं होतं सरकार बचत करनार अन् आपल्याला देनार. आता आमच्यात तर खानारी सा अन कमविनारी आमी दोगंच. त्ये बी कुटं रोजानी काम भेटलं तर. सासऱ्याची पेन्शन जाती त्याच्या औषद-पान्याला. घरात खायाला दाना पुरंना, बचत कशातनं करनार बाई?'

'पुरं...मला काय ठावं न्हाय का तुजी कथा? पर तरी बी बचत करावी लागती. माजी शेजारीन तर चार चार गटात हाय बग. योक झेडपीचा, योक पंचायत समितीचा, योक डीआरडी का कसला अन योक त्या संस्थेचा. आता तिची चार गटं हायती मग आपला एक तरी असावा का? अन् ती तर हायेच पर तिच्या नवऱ्याला बी नोकरी लागलीये की. '

'कसली नोकरी?'

'पैशे गोळा करायची. बायको बचत गट काढती अन् नवरा पैसे गोळा करत फिरतो.'

'चांगलाच हाय की जोड-उद्योग? म्हनून येवडी बचत बचत करायलीस व्हय्'

'गप...निस्तं तेवढ्यासाठी नाय गं...आपल्या संसाराला बी हातभार लागतुया...'

'त्यो कसा?'


'कसा म्हंजी? अडीनडीला कर्ज भेटतं..भांडवल भेटतं. माज्या शेजारनीनं तर पोरीचं लगीन बचत गटाच्या जोरावरच लावून दिलं बग. चारीकडनं पैसे उचलले अन् चांगलं जोरात लावलं लगीन. हुंडा बी दिला पन्नास.'

'आता समजलं तिच्याकडं इतका पैका कुटनं आला ते.'

'लई फायदे हायेत बग या गटाचे.'

'नसायला काय...आता पोराकडली मान्सं बचत गटवालेच पावने शोधतील अशानं. माजी नणंद सांगत व्हती तिच्या दिरासाठी पोरगी बघायला गेलते. दोन पोरी पाह्यल्या. एकीच्या माईचे चार गट अन् दुसरीचे पाच. मग काय पाचवालीची पोरगी केली. तरी मी तिला सांगितलंय की बाई जरा जपून. नाही तर व्हायचं बचत गट अन् नवरा कट.

'आं? म्हंजी गं?'
'आमचे मालक सांगायले व्हते काय तर म्हने पलिकल्ल्या गावात एका बचत गटाची अध्यक्ष बई होती न् तिच्या नवऱ्याचा काय तर कारनानं खून पडला. लोकांना बघवत न्हवतं तिचं काम. मंग काय उठवलं त्यांनी की त्या बईनंच केलंय म्हून. तवाधरनं बचत गट म्हन्लं की बिचकायलेत सारे.'
'मंजुळे, तू नेहमी आडवंच कसं लावतीस गं? लग्नाचं सोड...माजी सखुमावशी हाय ना. तिच्या पोरीची डिलवरी होती. तिच्या गटातल्या बायांना त्या भिमाले डॉक्टरच्या दवाखान्यात सवलत भेटती. मंग काय मावशीनी थेट तिला दवाखान्यात निऊन सिझ्झर केलं. एरवी कुटनं आणले असते तिनं दस हजार?'
'कोणता डॉक्टर म्हन्लीस? तो भिमाले ना...अगं त्याचे स्वतःचेच गट हायता म्हनं गावात. गटात गेलं की दवाखान्यात पैसे कमी.'
'ते काय ठावं नाय पर चांगली बचत झाली ना की बँका बी कर्ज देत्यात. आमी मागल्या वर्षीचं कर्ज येळेत फेडलं तर बँकेचा मॅनेजर, येवडा मोठा मानूस, सोता आलता आमाला भेटायला. काय सांगू माय?'
'त्यो तर लईच खूश असंल तुमच्या गटावर. बडे बडे लोक कर्ज बुडवायलेत. पर बाया कशा, धा-दस हजार बी नेटानं फेडीत राहतात. अन् आता तर काय कुनी बी यावं नी गट काढून जावं. बँकांची तर मजाच हाय.'
'बँकांची कसली बायांचीच मजा हाय्. लई डिमांड हाय. उसाची असती ना तशी बायांची पळवापळवी.'
'तरीच कमळे. परवा चक्कीवर जायले व्हते तर त्या पार्वतीनं चहालाच बोलविलं. एरवी बघत बी नाई अन् एकदम चहाच.'
'त्ये काई बी असू दे, गटाचा फायदा असतुच. फाटे फोडत राह्यलं तर आपली परगती कशी व्हनार?'
'कमळे, लईच मास्तरनीवानी बोलायलीस की गं...'
'मंग गटामुळंच बग.'
'आता ह्ये बी गटामुळंच?'
'व्हय. अगं गटात गेलं की चार गोष्टी कानावर पडत्याता, कसली कसली माहिती मिळती...आपुन कसं ऱ्हाचं त्ये समजतं. अन् बाया एकीला दोगी असल्या की जरा बळ येतं ते निराळंच.'
'पुरे. लई लांबन लावू नगं. अन् कसं ऱ्हाचं ते फकस्त बायान्लाच का...गडीमान्साला बी सांगाया नगं?'
'म्हंजी?'
'आता बग हां...घरात पैका कुनाकडं ऱ्हातो?'



'गड्याकडं.'
'घरी खायाला, खरचायला पैका कोन देतो? गडीच न्हवं? अन् दारु, गुत्तं, मटक्यावर पैका कोन उधळितो?'
'गडीच की...'
'मंग पैका बाईनं साठवायचा का गड्यानं? बोल की...'
'नगं...तूच बोल...'
'आता तू म्हन्तीस ते बराबर हाय. चार बाया एकत्र आल्या का आपलं दुख कुनाला तरी सांगाया येतंय. पर बायांना सोडनार का गं नवरे?'
'अगं मंजुळे कुटल्या जगात हायेस? उलट नवरेच मागे लागायलेत बचत गटात जावा म्हनून. आता आमच्या ह्यांचंच घे. मला दम देऊन गेलेत, दोन दिसात गट काढला न्हाईस तर

बग.तो सरपंच ह्यांच्या मागं लागलाय् बचत गट काढ म्हनून अन् हे माज्या मागं.'

'अन् तू माज्या मागं..'

'काय करु माय, गट काढायला म्हनून हिंडायले दिसभर तर सगळ्या बायका आउट ऑफ कवरेज. कोन कुटल्या गटात तर कोन कुटल्या गटात. निस्त्या सगळ्या एंगेज.'

'एक आयडिया सांगू का? बग उगा कावशील..'

'सांग बई.'

'किती बाया लागत्यात गं गटाला?'

'नऊ तरी पायजेत.'

'मंग असं कर, येशीवर जा. साती आसरा, येक सटवाई अन् येक खंडोबाची बानूबई, झाल्या नऊ. होतोय गट.'

'कशी अशी बालतीस गं? चेष्टा सोड. तू येतीस का ते अदुगर सांग.'

'तुला खरं सांगू कमळे...मला ना आताशा त्या पापड लोनच्यानी अगदी नको झालंय बग. घरी बी त्येच अन् गटात बी त्येच. माजी वैनी तर डोळ्यावर पेंग आली तरी पापड लाटत बसतीया बग. बायान्ला दुसरं बी काई शिकवावं का?'

'अगं पर दुसरं काय येतंय बायावान्ला?'

'का शिकविलं तर सगळंच येतंय् की...माजी एक लांबची जाव हाय त्या हैद्राबादकडं. ती सांगायली व्हती की तिथल्या गटाच्या बायांनी जिमिन घेतली अन् जोरात काही बी पिकं काढायल्यात. माळवं, दाळ, मूग-उडीद...सारंच. मस्त प्याक करुन इकत्यात दुकानानी. बर..खात बी शेनाचाच.चांगला पैका मिळायलाय त्यान्ला. मला तर लई पास पडली बग त्यांची शेती...सोताची.'

'मंजुळे, तुला बऱ्या कुटल्या बी गोष्टी माहित राहत्यात. अन् मगा उगा म्हनायली व्हतीस कसला गट अन् काय म्हून.'

'अगं मजा केली बग तुजी..असलं काही असंल तर मला बोलिव. उगाच मसाले कुटाया लावू नगं मला. न्हाई तर कुटं पुन्या मुंबईला नेचील अन् भाकरी थापाया बसवचील परदरशनात...लोक काय वच वच खात्याल अन् जात्याल. कंबरडं बायांचंच मोडनार न्हवं? तसल्या गटात नगं बई मला.'

'बरं... पुरे करतीस का आता? तुज्या भाषनात मिटिंगची येळ बी उलटली. अगं ह्यो गट येगळा हाय गं. सुभानरावाची बायकू सांगायली व्हती की कुन्या कंपनीचा माल इकाया देनार हायेत गटाला. साबन, तेल, शम्पू...बरंच काय काय हाय बग.'

'माल बनवायचा का निस्ता इकायचा?'

'निस्ता इकायचा.'

'अन त्येचा पैका गटाला का कंपनीला?'

'कंपनीला. आता काय तर कमिशन हाय म्हना...'

'कमळे, तुमाला दिसंना का गं...आता या साबन, शम्पूवर आपला बायाचाच पैका खरच व्हनार अन् त्यो सगळा जानार त्या कंपनीच्या खिशात. अन् आपल्यासारख्या किती तरी गटाच्या बाया त्येन्चा माल इकनार म्हंजी तर चांदीच हाय की. अन् आपल्याला काय रुपयात दमडी बी नाय बग...'

'तुजी तर ना शिकवनीच लावाया पायजे बग मंजुळे. डोकं लईच चालायलंय तुजं. पर त्ये सगळं राहू द्ये. गटात येनार हाइस, का मी होऊ पुढं?'

'नवं काय तरी शिकविनार असंल, अडी अडचनीला साथ देनार असंल, उद्योग धंदा सुरु करनार असंल, बायांचं कष्ट कमी करनार असंल तरच येते बग तुज्या गटात. कुटं मन्याच्या माळाच बनीव, कुटं रिक्षामं रेशनचं दुकानच चालीव अन् आता तर लोकावाच्या मागं संडास बांधा, संडास बांधा करत फिर...असली काम कराया मी न्हाई यायची तुज्या गटात. त्यापरीस फराकत छान झोप काढीन दुपारा. काय?'

## बचत गटांचे नाविन्यपूर्ण उपक्रम

बचत गटांमार्फत स्त्रियांना एकत्र आणण्याचे आणि उत्पन्न मिळवून देणारे अनेक वेगवेगळे उपक्रम विविध भागात संस्था संघटना करत आहेत. यातील काही मोजक्या उपक्रमांची माहिती जिव्हाळ्याच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोचावी अशी आमची इच्छा आहे जेणेकरुन इतरही गट असे काही उपक्रम सुरु करु शकतील.

तरी आपल्या भागात असा काही नाविन्यपूर्ण, शाश्वत आणि चांगलं उत्पन्न मिळवून देणारा प्रयोग जर बचत गट राबवत असतील तर त्याची माहिती आम्हाला नक्की पाठवून द्या. तसंच गटामुळे काय बदल झाले हेही लिहून पाठवा.

माहिती पाठवताना पुढील मुद्द्यांचा समावेश जरुर करावा.

- बचतीशिवाय गटाने काय कार्यक्रम हाती घेतले?
- उद्योगासाठी भांडवली खर्च किती आला आणि तो कसा पुरा केला, कर्ज घेतलं असल्यास किती व्याजदराने आणि कुठून
- या उद्योगातून मिळणारे फायदे, ते गटापर्यंत कसे पोचतात
- बचत गट सुरु झाल्यानंतर काय बदल झाले, त्याचा स्त्रियांना कसा फायदा झाला?
- स्त्रियांवरील कामाचा बोजा दूर करण्यासाठी गटाने काही प्रयत्न केला का? त्याचे काय परिणाम दिसतात?

शरीरसाक्षरता

# फिस्टुला - एक दुर्लक्षित आजार

बाबी १९ वर्षाची आहे. पाळी आली आणि लगेच तिचं लग्न झालं. तीन वर्षांनी दिवस गेले. बाबीचं गाव खूप दूरवर आहे आणि गावात एकच खाजगी दवाखाना आहे. अधून मधून कधी तरी सिस्टरबाई गावात येते, तीही दुपारी. डॉक्टर तर तिने कधीच पाहिला नाही. त्यामुळे गरोदरपणात तिची कसलीच तपासणी झाली नाही आणि तिला गोळ्या औषधंही मिळाली नाहीत. तिला कुणी बाळंतपण कसं होतं हेदेखील सांगितलं नव्हतं. बाबीच्या गावात पारुबाई नावाची अनुभवी दाई राहते. पण बाबीच्या कळा सुरु झाल्या तेव्हा ती नेमकी वारीला गेली होती. तीन दिवस कळा येतच होत्या. शेजारच्या मावशीने तिला खूप जोर लावायला सांगितला पण काही फायदा झाला नाही. अखेर काहीच होत नाही म्हटल्यावर तिला जवळच्या खाजगी दवाखान्यात नेलं. तिथे त्यांनी काहीच मदत केली नाही. म्हणून मग गाडी करुन तिला सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आलं. २/३ दिवस कळा सोसल्यावर सिझर करुन बाळ बाहेर काढलं. दोन दिवस दवाखान्यात राहून बाबी आपल्या गावी परत आली. हळू हळू तिच्या लक्षात आलं की लघवी आणि संडासवरचा तिचा ताबा सुटला आहे. नकळतच लघवी व्हायला लागलीये.

एक दिवस कामाला न जाता ती सिस्टरबाईला भेटली आणि तिची समस्या सांगितली. सिस्टरबाईने तिला जिल्ह्याच्या मेडिकल कॉलेजच्या इस्पितळात उपचार होतील असं सांगितलं. बाळंतपणानंतर तीन महिन्यांनी बाबी मेडिकल कॉलेजच्या इस्पितळात ॲडमिट झाली. संडास होण्याचा त्रास एका छोट्याशा शस्त्रक्रियेने दूर झाला. अजून तीन महिन्यांनी लघवीच्या त्रासासाठी शस्त्रक्रिया करावी लागेल असं डॉक्टरांनी सांगितलं.

पैशाच्या अडचणींमुळे दुसऱ्या शस्त्रक्रियेसाठी बाबी परत दवाखान्यात जाऊ शकली नाही. गेली तीन वर्ष ती हा त्रास सहन करत आहे. मायांगातून लघवी थेंब थेंब गळत राहते. त्यामुळे त्या जागी फोड आले आहेत आणि प्रचंड खाज सुटते. बाबी सांगते, मला जाड कापडं घ्यावी लागतात. मजुरीला तर जावंच लागतं. पण घाण येते त्यामुळे माझ्याजवळ कुणीच येत नाही. धुण्या भांड्याच्या कामात त्रास कमी पण मला या वासामुळे कोणीच कामावर घेत नाही. माझा नवरा मनाने खूप चांगला आहे. पण तोही कधीकधी मलाच नावं ठेवतो. आधीच्या ऑपरेशनच्यावेळी माझ्या वडिलांनी म्हैस विकली, आता कुणाकडेच पैसे नाहीत, कर्ज काढायचीही आमची ऐपत नाही.

बाबीच्या गावात अजून अशा दोघी तिघी आहेत त्याही अशाच त्रासातून जात आहेत. त्यातल्या एकीचं बाळ तर पोटातच गेलेलं होतं. पण कुणालाच काहीच उपचार मिळालेले नाहीत. काय असेल हा आजार?

बाबीला जो त्रास होत आहे. त्याला फिस्टुला म्हणतात. फिस्टुला म्हणजे जिथे नको तिथे भोक अथवा फट तयार होणं. प्रजननाशी संबंधित फिस्टुलामागचं सर्वात मोठं कारण म्हणजे अडलेलं बाळंतपण. खूप जास्त दिवस कळा आल्यावरही किंवा खूप जास्त जोर देऊनही बाळ बाहेर न आल्यास योनिमार्गामध्ये इजा होऊ शकते. मूत्राशय आणि योनिमार्गाच्या मधल्या त्वचेला भोक पडून लघवी योनिमार्गातून बाहेर येऊ लागते. कधी कधी गुदाशयाच्या त्वचेला भोक पडून शौचाचे कण योनिमार्गातून बाहेर येऊ शकतात. आफ्रिका व आशिया खंडातील गरीब स्त्रियांमध्ये या आजाराचं प्रमाण खूप जास्त आहे.



खूप लहान वयात लग्न होऊन लवकर बाळंतपण आल्यास, मुलीची पुरेशी वाढ झालेली नसते. कंबरेची हाडं पुरेशी बळकट झालेली नसतात. अशा स्थितीत प्रसूतीच्या वेळी बाळाचं डोकं बाहेर यायला त्रास होतो. बाळंतपण अडतं आणि मूत्राशय किंवा गुदाशयाच्या त्वचेवर बाळाच्या डोक्याचा सतत दाब पडत राहतो. यातून त्वचेला भोक पडते. अनेकदा अशा बाळंतपणात बाळ मृतावस्थेत जन्मते. बाळंतपणानंतर ही इजा बरी होत नाही आणि योनिमार्गातून लघवी सतत बाहेर येत राहते. यामुळे योनिमार्गात फोड, व्रण तयार होणे, खाज सुटणे असे त्रास सुरू होतात. सततच्या लघवीमुळे वास यायला लागतो. वैद्यकीय मदत न मिळाल्यास जगणं असह्य होऊ शकतं.

**प्रसूतिशिवाय इतर कारणं**

असुरक्षित गर्भपातामध्येही योनिमार्गाला इजा होण्याचा धोका असतो. तसंच बलात्कार व लैंगिक शोषण, प्रजनन मार्गाचे कर्करोग, रेडिएशन ही इतर कारणं आहेत. प्रसूतीसाठी तात्काळ सेवा न मिळणं हे सर्वात मोठं कारण आहे. बाळंतपण अडल्यास सिझेरिअन शस्त्रक्रियेद्वारे बाळंतपण करणं गरजेचं असतं. पण तशा सुविधा, कुशल आरोग्य कर्मचारी उपलब्ध नसल्यास हा धोका वाढतो किंवा अशा सुविधांपर्यंत बाई पोचू न शकणं हेही मोठं कारण आहे.

**प्रमाण**

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार दरवर्षी ५०,००० ते १,००,००० स्त्रियांना फिस्टुलाचा त्रास सुरू होतो. सध्या सुमारे २० लाख स्त्रिया फिस्टुलाचा त्रास सहन करत आहेत असा अंदाज आहे. आफ्रिका आणि अशिया खंडामध्ये गरीब स्त्रियांमध्ये ही समस्या अतिशय तीव्र स्वरूपात आढळून येते.

**फिस्टुलाचा धोका जास्त कोणाला? कशामुळे?**

कमी वयात बाळंतपणं तसच बाळंतपणामध्ये कमी अंतर हा सर्वात मोठा जबाबदार घटक आहे. याच जोडीने प्रसूतीच्या तातडीच्या सेवा न मिळणं हाही जबाबदार घटक आहे. कुपोषण आणि कमी वयात लग्न यामुळेदेखील मुलीच्या शरीराची पुरेशी वाढ होत नाही व बाळंतपणाचा ताण सहन करू शकत नाहीत. कमी शिक्षणामुळे सेवा घेण्याच्या, निर्णय घेण्याच्या संधीदेखील कमी होतात.

**आजार बळावल्यास काय परिणाम होतात?**

किडनीवर परिणाम होऊन किडनी निकामी होऊ शकते. परिणामी मृत्यूही येऊ शकतो. लघवी जास्त होऊ नये म्हणून पाणी कमी प्यायलं जातं. ज्यातून शोष व अंगातील पाणी कमी होण्याची शक्यता असते. जर नस दुखावली गेले असली तर पाय निकामी होऊ शकतात. चालण्यात अडथळा येतो.

फिस्टुलाचा त्रास असणाऱ्या अनेक स्त्रिया नैराश्याच्या बळी ठरतात. घरच्यांनी/नवऱ्याने सोडून देणे, वाळीत टाकणे आणि वास व सतत लघवी होत राहिल्याने एकटीने राहणे अशा परिस्थितीत स्त्रिया वेदना, अपमान, एकाकीपणा सहन करत राहतात.

**उपचार**

गुंतागुंत नसणाऱ्या स्त्रियांसाठी शस्त्रक्रिया ९०% यशस्वी ठरते. इतर काही गुंतागुंत असल्यास हाच दर ६०% इतका आहे. जर शस्त्रक्रिया करणं शक्य नाही तर एक नळी मूत्रमार्गातून मूत्राशयात बसवली जाते. यामुळे लघवी बाहेर पडायला मदत होते आणि योनिमार्गातील लागण कमी व्हायला /बरी व्हायला मदत होऊ शकते, तरीही डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे. जवळच्या सरकारी रुग्णालयात तपासून घेणं गरजेचं आहे.

(साभारः मैत्री आरोग्याशीः स्त्रिया आणि आरोग्य संवाद पुस्तक, तथापि व माविम प्रकाशन)

*फिस्टुला या आजाराबद्दल बायांना अजूनही फारशी माहिती मिळालेली नाही. तसंच याच्यावर कुठे उपचार मिळतील हेही नीटसे माहित नसते. आपल्या भागात जिल्ह्याच्या रुग्णालयात किंवा वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयात यावरील शस्त्रक्रिया होते का याची माहिती काढता येईल. आपल्या भागात जर यावर उपचार होत असतील आणि याआधी कुणी ते करुन घेतले असतील तर त्याची माहिती आम्हाला जरुर कळवा. याविषयी एक माहितीपत्रक सध्या तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये या माहितीचा समावेश करता येऊ शकेल.*

*प्रिय वाचक,*
*गेले १० वर्षं सातत्याने जिव्हाळा निघत आहे. यापुढे त्यात खंड पडू नये यासाठी तुमच्या आर्थिक हातभाराची गरज आहे. जिव्हाळ्याची वर्गणी भरुन तुम्ही आम्हाला मदत करत आहातच. पण याहून अधिक आर्थिक सहाय्याची आता गरज भासते आहे. जिव्हाळ्याच्या एका अंकाचा छपाई खर्च (रू. ५०००/-) वर्गणी स्वरुपात देऊन तुम्हीही हातभार लावू शकता. तसंच जिव्हाळ्यासंबंधी इतर प्रतिक्रिया असल्यास त्यांचं स्वागत आहे.*


ह
म
स
फ
र

# मी आणि माझी वस्ती

*तोड मर्दा तोड ही चाकोरी ही पुस्तिका तथापि ट्रस्टने नुकतीच प्रकाशित केली. समानतेच्या दिशेने पुरुषांसोबत काम या पुरुषांसोबतच्या संवादाच्या प्रकल्पात सलग दोन वर्षे गाव-वस्तीपातळीवरील गट सदस्य किवा त्यात्या संस्थांचे कार्यकर्ते म्हणून सामील झालेल्या युवक, विवाहीत पुरुष आणि स्त्रियांच्या गोष्टींची ही पुस्तिका प्रकल्पाचा एक महत्वाचा दस्तऐवजच आहे. या गोष्टी गाव-वस्तीत समानतेच्या आणि समतेच्या दिशेने झालेल्या प्रत्यक्ष हस्तक्षेपांची माहिती तर देतातच पण या कामाचे परिणाम, कामातील अडचणी आणि आव्हानांची ओळखही करून देतात. त्यातीलच एक गोष्ट जिव्हाळ्याच्या वाचकांसाठी संक्षिप्त रुपात देत आहोत.*

राघवेंद्र अलकुंटे हा २३ वर्षाचा विवाहित तरुण मड्डीवस्ती, शांतीनगर, सोलापूर येथे राहतो. मड्डीवस्ती ही सोलापुरातील मोठी झोपडपट्टी आहे. झोपडपट्टी म्हणजे दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या अनेक जाती-जमातींच्या झोपड्यांचा चिगुर. संडास, बाथरूम, पाणी, लाईट, अंगणवाडी, शाळा, सूर्यप्रकाश, स्वच्छ हवा या जीवनावश्यक बाबींचा येथे अभाव आहे. या झोपडपट्टीत राघवेंद्र, चार भाऊ, वहिनी, बायको आणि आई-वडील यांच्यासह राहतो. जातीनं वडार. बांधकाम व्यवसायाला लागणारे कष्ट राघवेंद्रसह भाऊ आणि वडील करत आहेत. संगमेश्वर महाविद्यालयात द्वितीय वर्ष कला शाखेत तो शिक्षण घेतो. शिक्षण कसलं... सुट्टीच्या दिवशी तो कधी कधी महाविद्यालयात जातो. शिवाय रात्री आय सी डब्ल्यु ए चे शिक्षण घेतो.

राघवेंद्रनं संस्थेचे बरेच कार्यक्रम पाहिले, ऐकले व त्यात भागही घेतला. तो सांगतो, 'आपली संस्कृती पुरुषप्रधान आहे. तिचा लोप झाला पाहिजे. घरच्या प्रॉपर्टीत स्त्रियांना पन्नास टक्के वाटा मिळाला पाहिजे. बायकोनं नवऱ्याचं ऐकावं, नवऱ्याचा शब्द पाळावा. नवरा चांगला असो की वाईट, पण तिनं त्याला मान द्यावा ही प्रथा वाईट आहे. स्त्रियांना घराबाहेर पडू दिलं जात नाही. आमच्या वस्तीवर स्त्रियांसाठी चूल आणि मूल एवढंच आहे. पुरुष स्त्रियांना घाण घाण शिव्या देतात. याविरुद्ध बायको काहीच बोलू शकत नाही.' हे असं आहे म्हणून राघवेंद्र म्हणतो, 'पुरुष प्रधान संस्कृती नसायला पाहिजे. स्त्रियांना पण समान हक्क मिळायला पाहिजेत.'



राघवेंद्रला समाजात सर्वत्र स्त्री-पुरुष विषमताच दिसते. समानता कोठेच दिसत नाही. पुरुष आपल्या बायकांना आणि मुलींना इतर पुरूषांशी बोलू देत नाहीत. मुलाला शिकवतात पण मुलीला शिकवत नाहीत. मुलांच्या नावे बँकेत पैसे असतात. घरची प्रॉपर्टी मुलांच्या नावावर असते. पुरुषांनी घरात ताट धुवायचं नाही, अंथरूण घालायचं नाही, झाडून काढायचं नाही, त्याला बसल्या ठिकाणीच जेवायला पाहिजे, पाणी द्यायला पाहिजे, कामाला जाताना बायकोने डबा बांधून दिला पाहिजे. या कार्यक्रमात सहभागी झाल्यापासून राघवेंद्रने प्रकल्पातील विचारांची रुजवात आपल्या घरातून केली आहे. त्याची बायको पूर्ण निरक्षर आहे, पण त्यानं तिला घरात शिकवण्यास सुरुवात केली आहे. त्यानं तिला अंकलिपी देऊन अक्षर ओळख करून दिली आहे.

या समानतेच्या कार्यक्रमामुळं राघवेंद्रची मड्डीवस्ती बदलत आहे. जी मुले पूर्वी पाणी भरत नव्हती, झाडू मारत नव्हती, ती आता ही सर्व कामं करू लागली आहेत. राघवेंद्रही घरची कामं करू लागला आहे. त्याच्या घरी खूप माणसं असल्यानं खूप पाणी लागतं. तो आता २५ घागरी पाणी भरतो. भाजीपाला आणण्यासाठी जातो. अंगण, घर झाडून काढतो. स्त्रियांना ही कामं करण्यास किती कष्ट पडत असतील याचा अंदाजही त्याला आहे. पूर्वी त्याला हे काम करण्याची लाज वाटायची, राघवेंद्र पाणी भरताना आणि झाडू मारताना त्याला एका मित्रानं बघितलं. तो म्हणाला,

पान ११ वर पहा

# सच्चर समिती अहवाल : एक अवलोकन

**रचना विकास न्यासाविषयी**

हा एक सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या समविचारी व्यक्तींना पुढाकार घेऊन रचनात्मक कामासाठी उभारलेला एक मंच आहे. स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक विषमतेला लोकाभिमुख आणि लोकसहभागावर आधारित विकासाच्या नीतीद्वारे उत्तर दिले जाऊ शकते असे रचना विकासाचे मत आहे. त्यासाठी असंघटित, शोषित समाज गट, अल्पसंख्यांक समुदाय, कमकुवत गट, आदिवासी, स्त्रिया यांच्या सहभागावर आधारित विकासाची प्रयोगकेंद्रे उभी करण्याचा रचना विकास न्यासाचा प्रयत्न आहे.

**पुस्तिकेविषयी**

न्यायमूर्ती राजेंद्र सच्चर यांच्या समितीने भारतातील मुस्लिम समाजाच्या परिस्थितीसंबंधी अहवाल संसदेला डिसेंबर २००६ मध्येच सादर केला आहे. भारतीय मुसलमानांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सच्चर समिती नेमली जाण्याच्या मुद्द्यावरच सर्वप्रथम गदारोळ झाला, नंतर जेव्हा संबंधित माहिती गोळा करण्यासाठी सरकारी यंत्रणेकडे आणि खाजगी उपक्रमांकडे समितीने पत्रे पाठवली तेव्हाही गदारोळ केला गेला आणि सरतेशेवटी जेव्हा सच्चर समितीचा अहवाल संसदेला सादर केला गेला तेव्हा देशभर त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. मात्र समितीचा अहवाल सर्वसामान्य समाजापर्यंत आणि कार्यकर्त्यांपर्यंत तो नेमकेपणाने पोचला नाही. तो सर्वांपर्यंत पोचावा यासाठी यी पुस्तिकेचा उपयोग होऊ शकेल.

पुस्तिकेमध्ये सच्चर समिती अहवालाचे महत्त्वाचे निष्कर्ष आणि आकडेवारी सोप्या भाषेत देण्यात आली आहे. तसंच शिक्षण, रोजगार आणि इतर लोकसंख्याविषयक आकडेवारींचे तक्ते शेवटी देण्यात आले आहेत.

**लेखन**: रजिया पटेल, **प्रकाशन**: रचना विकास ट्रस्ट
**पत्ता**: १७, सुयोग हाईट्स, स्नेह पॅरडाइज, रामबाग कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८, **दूरध्वनी**: (०२० २५४३१६५३)
**पाने**: ३२, **मूल्य**: रु. ३० फक्त (सामाजिक संस्थांना सवलतीत उपलब्ध)

---


पान १० वरून पुढे चालू

'हे तर जगातलं आठवं आश्चर्यच म्हणायचं'. आई-वडीलांना मात्र राघवेंद्रच्या कामाचा आनंद झालाय. 'देव तुला असंच काम करण्याची बुद्धी देवो', त्याची आई म्हणते.

या कार्यक्रमाचं फलित म्हणजे, राघवेंद्र आता आपल्या वडार समाजाविषयी विचार करू लागला आहे. चार-पाच हजार लोकवस्तीच्या या झोपडपट्टीत एकही वडार स्त्री शिकलेली नाही याची खंत त्याच्या चेहऱ्यावर होती. दिवसभर बांधकाम व्यवसायात मदतनीस म्हणून कष्टाचं काम करणाऱ्या राघवेंद्रचं शिक्षणाकडं बरचं लक्ष आहे. तो स्वभावानं जसा शांत दिसतो तसाच बोलतानाही विनयशील वाटतो. अशा या शांत आणि विनयशील राघवेंद्रला कारण नसताना कोणी घाण-घाण शिव्या दिल्या, वस्तीतल्या पुरुषांनी स्त्रियांना मारलं, शिव्या दिल्या तर फार राग येतो. यावर त्याने एक उपाय शोधलाय. शिव्या देणारा कोणाचं ऐकतो हे तो शोधून काढून त्या इसमाच्या मार्फत तो त्याला समजावून सांगतो.

राघवेंद्रचा एक मित्र कधीही घरकाम करेल असं कोणाला वाटत नव्हतं पण त्याला झाडू मारताना पाहून राघवेंद्रला फार आनंद झाला. हीच घटना राघवेंद्रला महत्वाची वाटते.

*तोड मर्दा तोड ही चाकोरी, तथापि, देणगी मूल्य रु. २० मात्र*
*रंगीत पोस्टर, देणगी मूल्य रु. १० मात्र* ❑






**PRINTED MATTER** **बुक पोस्ट**

प्रकाशक

**तथापि ट्रस्ट**
४२५ डी पी– ७७, टिमवि कॉलनी,
मुकुंद नगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी : ०२० – २४२६०२६४; २४२६७९०८
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org

प्रति

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

चित्रेः राजू देशपांडे. पारगावच्या परावरुन लेखावरील प्रतिक्रियांसाठी विनया मालती हरि व किरण मोघे यांचे आभारी आहोत.

**जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक – रु. ३५, तीन वर्षासाठी – रु. १००** **खाजगी वितरणासाठी**